ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 8 | APRIL - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# महानुभाव संप्रदाय आणि साहित्य निर्मिती

संध्या रूस्तुम येवले
टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणे.

## प्रस्तावना –



यादवाच्या राजवटीखाली नांदणाऱ्या तेराव्या शतकातील महाराष्ट्रात अनेक धर्मसंप्रदाय अस्तित्वात होते. त्यात जैन, बौध्द,नाथ, महानुभाव, लिंगायत, वारकरी, दत्त, वैष्णव, अवधूत, आनंद, इत्यादींचा समावेश होतो. या धर्म आणि सांप्रदायात तांत्रिक दृष्ट्या कोणतेच मतैक्य नव्हते. महाराष्ट्रातील सर्व स्थरातील लोकांना आपला नेमका कोणता धर्म आहे हे समजायला मार्ग नव्हता. जो तो आपआपल्या सांप्रदायातील व्रताचरण निष्ठेने करित होता. एकूणच या काळातील महाराष्ट्राच्या समाजव्यवस्थेचा विचार केला तर ती धर्माधिष्ठित होती. असे म्हणण्यापेक्षा ती रूढी परंपरेला चिकटून होती. याच पार्श्वभूमीवर याच काळात म्हणजे शालिवाहन शकाच्या बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी भाषेला ज्ञानभाषेचे स्थान देणारा एकेश्वरी भक्तीचा पुरस्कार करणारा, सामाजिक विषमता नाकारुन सर्वांनाच मोक्षाचा अधिकार देणारा, सामाजिक विषमता नाकारुन सर्वांनाच मोक्षाचा अधिकार देणारा महानुभाव संप्रदाय उदयास आला. पंथाचे संस्थापक श्री चक्रधरस्वामी यांचे शके 1142 मध्ये महाराष्ट्रात आगमन झाले आणि त्यांनी रिध्दिपूर येथे जाऊन महानुभावांचे चतुर्थकृष्ण श्री.गोविंदप्रभू यांचे दर्शन घेतले. त्यांच्याकडून त्यांनी पारावरशक्तीचा स्वीकार केला आणि तेव्हापासून महानुभाव पंथ उदयास आला. परमार्ग म्हणूनही हा पंथ प्रचलित होता. 'परमार्ग' म्हणजे परमेश्वराचे ज्ञान देणारा मार्ग. त्यानंतरच्या काळात महात्मा पंथ, अच्चयुत पंथ, भटमार्गरू जयकृष्णी पंथ म्हणून आणि महाराष्ट्रात महानुभाव पंथ म्हणून आज हा संप्रदाय ओळखला जातो.

## व्याख्या – वि.भि.कोलते

श्री.चक्रधरांच्या तत्वज्ञानामुळे वैदिक संप्रदाय, अद्वैत सिध्दांत, चातुवर्ण्यव्यवस्था, सामाजिक विषमता, सदानादी आचार, वेदपुराणादी शास्त्रांचे महत्व कमी व्हायला लागले होते.

## श्री चक्रधर स्वामी –

श्री चक्रधर स्वामी यांच्या जन्माची आवताराची कथाही अलौकिक आहे. त्यांचे पूर्वीचे नाव हरपाळदेव होते. गुजरातेतील भरवस राज्याचा एक राजा होता त्याचे नाव मल्लदेव होते. या मल्लदेवाचा विशालदेव नावाचा प्रधान होता. हरिपाळदेव हा या प्रधानाचा मुलगा इ.स. 1194 मध्ये त्यांचा जन्म झाला. तरूण झाल्यावर त्यांचे लग्न झाले. त्यांच्या पत्नीचे नाव कमळाइसा होते. ती अत्यंत लावण्यवती होती. सर्व सुखसोयी प्राप्त झाल्यामुळे हरिपाळदेवाची विलासी वृत्ती वाढली त्यातच त्याला सोंगट्या खेळण्याचा छंद लागला. सोंगट्या खेळणे हा दयुताचाच एक प्रकार होय. मात्र तो अन्याय्य किंवा असभ्य कधीही वागला नाही. तो कृष्णभक्त होता. याच काळात एक घटना घडली. महाराष्ट्रात त्याकाळात सिंघण यादवराजा राज्य करीत होता. गुजरात प्रांत महाराष्ट्राला लागूनच आहे. गुजरात आपण जिंकावे ही त्याचेअनेक दिवसांपासूनची मनीषा होती. सिंघणाने गुजरातवर स्वारी केली यावेळी प्रत्यक्षा

प्रधनापुत्र हरिपाळ या युध्दात उतरला. तो प्रधान सेनापती होता. ही घनघोर लढाई त्याने जिंकली. याच युध्दात त्याच्या डोळ्याला भुवईवर जखम झाली.

पुढे वयाच्या चाळीसाव्या वर्षी एका अल्प आजाराने हरिपाळाचे अकस्मात निधन झाले. त्याचे मृत शरीर स्मशानभूमती आणले गेले. त्यावेळी द्वारकेला असलेले फलटणचे श्री. चांगदेव राऊळ उर्फ चक्रपाणि यांनी हतिरपाळाच्या मृतदेहात प्रवेश केला. आधिच्या हरिपाळाचे देहधर्म त्यांनी स्वीकारले. आपल्या नवीन अवताराची कल्पना येऊ नये म्हणून सर्वांनी विचारलेल्या प्रशनची योग्य उत्तरे दिली.

चांगदेव राऊळ आधीच विरक्त वृत्तीचे होते. त्यांना चार भिंतीमध्ये राहून संसार करायचा नव्हता, तर साऱ्या विश्वाचे दुखनिरसन करायचे होते. एकदा द्यूतात जवळचे द्रव्य हरल्यावर त्यांनी आपली पत्नी कमळाइसा हिच्याजवळ दागिण्याची मागणी केली. हे आपले स्त्रीधन आहे, ते मी देणार नाही असे म्हणून तिने स्पष्ट नकार दिला. हरिपाळास गृहत्याग करण्यास तेवढेच कारण पुरे होते. त्यांनी रामटेकला जायचे ठरविले व तसा आपला मनोदय इाईवडिलांना बोलून दाखविला. त्यांनी पुत्रप्रेमामुळे बाहेर पडण्यास विरोध केला. हरिपाळ ऐकेना शेवटी नाइलाजास्तव त्यांनी परवानगी दिली. सोबतीला काही सेवक दिले. सेवकांना चुकूवून हरिपाळ रिध्दपूरला आले. अमरावतीपासून पूर्वेकडे सुमारे 50 किलोमीटर अंतरावर हे गाव आहे. तेथे श्री गोविंदप्रभूंचे शिष्यत्व हरिपाळांनी पत्करले. त्यांच्या पासून ज्ञान प्राप्त केले. तेव्हाच श्री प्रभूंनी त्यांचे 'चक्रधर' असे नाव ठेवले. रिध्दपूरला गुरूजवळ काही दिवस राहिले. तेथून ते सालबर्डी येथे गेले. अमरावतीपासून सुमारे 80 कि.मी. अंतरावर असलेल्या या सालबर्डीच्या डोंगरात श्री चक्रधरस्वामी 12 वर्षे राहिले. एक प्रकारे ही तपश्चर्याच होती. यानंतर त्यांनी भ्रमंतीला सुरवात केली. काटोला (जि.नागपूर) येथे आल्यानंतर त्यांनी उधळीनाथाकडून वयस्तभिनी नावाची विद्या गृहण केली.

श्री चक्रधरस्वामी अत्यंत विरक्त वृत्तीचे होते. भ्रमंतीत रसत्याने जात असताना त्यांचे केस काट्यात गुंतत, शरीर ओरखडले जाई. त्यात काटे रुतत, रक्ताचेबिंदू निघत. ते सोन्यावर माणिकाचे लहान–लहान खडे शोभून दिसावे तसे दिसत. या एकाकी परिभ्रमणात त्यांना निळभट्ट भांडारेकर, रामदेव , नागबिका, बाणेबाई, इत्यादी शिष्य मिळाले. श्री चक्रधरांचा एकाकी वृत्तीचा काळ संपल्यावर ते अधिक लोकभिमुख झाले.

## साहित्यनिर्मिती –

महानुभावांची साहित्यनिर्मितीही अफाट आहे. या साहित्यनिर्मितीला या व्यासंगी पंडितांची वाड्.मयीन व तात्विक दृष्टी महत्वाची ठरली. इतर संप्रदायाप्रमाणे महानुभावपंथातही स्मरणभक्तीला खूप महत्व आहे. अर्थात हे स्मरण 'हे देखले तैसे आठवीजे' (ली. उत्त.609) या स्वामींच्या सूत्राप्रमाणेच होणे आवश्यक आहे. महानुभवांच्या साहित्यनिर्मितीला हे सूत्रच प्रेरणास्थान ठरले आहे. म्हाइंभटझ।फ़ँभ आचार्य नागदेवांना स्वामीच्या लीळा बांधू का म्हणून विचारले, त्यामागे स्मरणभक्तीचीच प्रेरणा होती. ज्यांनी सवामींना पाहिले नाही, त्यांना देव कसा आठवता येईल? या प्रश्नाने म्हइंभटांना स्वामींच्या लीळा बांधण्याची कल्पना सुचली भटोबासानी परवानगी दिल्यावर म्हइंभटांनी अनेकांकडून स्वामीच्या लीळा विचारल्या त्यासाठी त्यांना अतिशय कष्टही सहन करावे लागले. 'स्मृतिस्थळा'त त्यांने अनेक पूरावे उपलब्ध आहेत. आचार्यांनी या सर्व लीळा तपासून दिल्या 'स्मृतिस्थळा'त यासंबंधी आलेला तपशील असा– ''मग म्हाइंभटही लीळा सोधुनी आणिलिया तिया भटोबासापुढां संबादलीय मग भटोवासी म्हणीतले हे गोसावीयाचीचा श्रीमुखीचे शब्द होतीहे नव्हेति.'' याप्रमाणे लीळांचे संशोधन झाले. मराठी साहित्यातील संशोधनाची पायाभरणी याप्रमाणे झाली. परमेश्वराच्या चरित्रात कोणत्याही प्रकारचे असत्य लिहिले जाऊ नये, या जाणिवेतून नागदेवाचार्यांनी प्रत्येंक लीळा तपासून घेतली अशा प्रकारे संशोधनाचा डोळस आदर्श ठेवत 'लीळाचरित्र' हा मराठीतील आद्य गद्यग्रंथ निर्माण झाला.

'लीळाचरित्रा'च्या जडणघडणीत मराठीतील आद्य कवयित्री महदंबा ऊर्फ महदाइसाचा मोठा वाटा आहे. महदंबा अतिशय जिज्ञासू होती. स्वामीना ती सातत्याने प्रश्न विचारून आपल्या मनातील शंकाचे निरसन करीत असे. म्हणूनच स्वामींनी तिच्याबद्दल ''म्हतारी जिज्ञासक म्हतारी चर्चक म्हतारी एथ काही पुसताचि असे'' असे गौरवोद्‌गार काढले होते. एकाकी अवस्थेतील स्वामींच्या सर्व आठवणी महहदंबेच्या जिज्ञासुवृत्तीनेच स्वामींनी सांगितल्या. त्यामुळे 'लीळाचरित्रा'त स्वामींच्या एकाकी अवस्थेतील लीळाचांही समावेश झाला. 'लीळाचरित्र' मराठी भाषेतील पहिला गद्यराज, पहिला चरित्रग्रंथ म्हणून तर त्याचे मूल्य आहेच. परंतु त्याचबरोबर यादवकालीन मराठी भाषेचे व्यावहारिक स्वरूप कळण्याचे एक साधनग्रंथ म्हणूनही त्यांचे मूल्य आहे. तत्वज्ञान, इतिहास, राज्यशास्त्र,

व्यापारशास्त्र, भूगोल, कला काव्य, नाट्य, संगीत, साहित्यशास्त्र या सर्वांचेच उत्तम दर्शन लीळाचरित्रज्ञतून होते. या सगळ्या वैशिष्ट्यांमुळे मराठी वाड्.मयीन सृष्टीतील पहिले वहिले अपत्य असूनही पुढील साहित्य निर्मितीसाठी 'लीळाचरित्र' एक आदर्श मानदंड ठरला आहे. केशिराजव्याप्त या पंडिताने लीळाचरित्रातील सूत्रे एकत्र करून सूत्रावळ ग्रंथाची निर्मिती केली. त्याचप्रमाणे सूत्रांच्या स्पष्टीकरणार्थ स्वामींनी सांगितलेले दृष्टांत वेगळे काढून 'दृ ष्टांतपाठ' तयार केला. 'स्थानपोथीचा श्री चक्रधरनिरूपित 'श्रीकृष्ण चरित्र' या ग्रंथाची निर्मितीही 'लीळाचरित्रा'तूनच झाली. 'सूत्रपाठा'तील 'लक्षण' 'आचार' व 'विचार' या प्रत्येक प्रकरणावर 'प्रमेय', 'स्थळ'. 'छंद' यासारखे भाष्यग्रंथ रचले जाऊन महानुभाव तत्वज्ञानाचे सूसूत्र व्यवस्थापन झाले. शके 1208 च्या सुमारास निर्माण झालेले महदंबेचे 'धवळे' हे मराठीतील पहिले काव्यबिंबायन ठरले. त्यानंतर 'रूक्मिणी—स्वयंवर', भास्करभट्ट बोरीकरांचे 'शिशूपाळा वध', 'उध्दवगीता', दामोदरपंडित 'वच्छाहरण', रवळोबासकृत 'सह्याद्रिवर्णन', विशवनाथ बास कृत 'ज्ञानप्रबोध' आणि नारायणबास कृत 'ऋध्दिपूरवर्णन' हे सातीग्रंथ केशिराजव्यासांचा 'मूर्तिप्रकाश' तसेच श्रीकृष्णचरित्रपर आख्याने, दत्तात्रेयबाळक्रिडा, अनेक कविकृत 'गीताटीका'. स्थलमहात्मे व मूर्तिवर्णनपर काव्ये, अनेक कवीकृत रूक्मिणीस्वयंवरे, श्रीकृष्णतर विवाहकथा, द्रोपदीस्वयंवरे आणि अनेक प्रकारची स्फूटरचना अशा वैविध्यपूर्ण काव्यनिर्मितीमुळे मध्ययुगीन काव्यपरंपरेचा एक वैविध्यपूर्ण व समर्थ इतिहास महानुभावानीनिर्माण करून ठेवला आहे.

## मराठी धर्मभाषा —

महानुभावांची ही साहित्यनिर्मिती मराठी भाषेतून आहे. महानुभाव संत हे संस्कृतचे गाढे पंडित होते, त्यामुळे, त्यांना संस्कृतमधून साहित्यनिर्मिती करता आली असता. परंतु संस्कृतमधील अगदी तुरळक निर्मिती सोडता त्यांची संबंध साहित्यसेवा ही मराठी भाषेतूनच आहे. मुख्य म्हणजे, मराठी भाषेला धर्मभाषेचे स्थान देण्याचा पहिला मान महानुभाव पंथालाच जातो. श्री चक्रधरस्वामी गुजरातमधून येऊनही ते 'मराठी अनावर' म्हणजे अस्खलितपणे बोलत होते. संस्कृत भाषेतून चालणाऱ्या धर्मव्यवहाराला नाकारून महानुभावांनी हा धर्मव्यवहार मराठी भाषेतून सुरू केला . मोठीच भाविकम क्रांती म्हणावी लागेल. आपले सर्व तत्वज्ञान त्यांनी मराठीतून सांगितले त्यामुळे पुढे श्री.नागदेवाचार्यानीही श्री चक्रधरस्वामींनी निरूपण केलेल्या मराठी भाषेलाच सर्वांनी वापर करावा, असा दंडक घातला. संस्कृतमधून प्रश्न विचारणाऱ्या दामोदर पंडित आणि केशिराजव्यासांना तर नागदेवांनी ''तुमचा अस्मातू कस्मातू मी नेणें गामज श्री चक्रधरांचे मऱ्हाटी निरूपीला ते मी मऱ्हाटी जाणे गा अन् तिथाची माते पुसांवे'' असे स्पष्टच सांगितले आहे.

## लिप्यांची निर्मिती —

महानुभावांनी निर्मण केलेले हे सर्व विचारधन त्यांनी, लिप्यांमध्ये बंदिस्त करून ठेवले, 'सह्याद्रीवर्णन' कत्या रवळोबासांनी 'सकळा' ही पहिलि लिपी तयार केली. त्यानंतर सुंदरलिपी, हंसलिपी, 'श्रील्लिपी', 'अंकलिपी', 'पारमांडल्यलिपी', 'शून्यलिपी', अशा एकूण चोवीस लिप्यांची निर्मिती महानुभावांनी केली. परंतु अधिकाधिक साहित्य मात्र सकळालिपीमधूनच त्यांनी जतन करून ठेवले आहे. मुख्यत लीळाचरित्राची मूळप्रत खालसेंयाच्या धाडीत गहाळ झाल्याने आपले हे ईश्वरीचे विचारधन कोणाच्याही हाती लागू नये म्हणून ते लिप्यांमध्ये बंदिस्त करून ठेवले जाऊ लागले. याचा एक फायदा असा झाला की, महानुभावांचे मूळ साहित्य हे अधिकाधिक शुध्दास्वरूपात जतन केले गेले. परंतु, त्या साहित्याचा जो एक प्रभाव समकालीन इतर साहित्यांवर पडणे आवश्यक होते, तसे मात्र होऊ शकले नाही. कदाचित, मराठीतील गद्यपरंपरा ही त्या प्रभावातून अधिक समृध्दही होऊ शकली असती. कारण महानुभावांची गद्यनिर्मिती सोडली तर पुढे बहामूनी काळापर्यंत गद्य साहित्याची निर्मितीच झालेली नसल्याचे दिसून येते. महानुभावांचे साहित्य विपुल व वैविध्यपूर्ण आहे. मध्ययुगीन मराठी साहित्यात इतकी विपुलता व विविधता कोणत्याही धर्मसंप्रदायाच्या साहित्यात नाही. साधारणत पंधराव्या सोळाव्या शतकापर्यंत महानुभावाच्या साहित्यनिर्मितीत सातत्य दिसून येतते. पुढील काळातील साहित्यांत वाड्.मयीन गुणवत्ता आणि तत्वज्ञानाचा दर्जा टिकून राहिला नाही. ती काहीशी स्फुटस्वरूपाचीच अधिक असल्याचे दिसून येते. परंतु असे असले तरी मध्ययुगीन कालखंडातील महानुभावांची ही साहित्यनिर्मिती सर्वच दृष्टीनी मराठी साहित्याचा आदर्श बिंदू ठरली. याबद्दल कोणत्याही संशोधक अभ्यासकाचे दूमत असू नये, असे वाटते. आजवर महानुभावांचे अनेक ग्रंथ संशोधकांच्या अफाट परिश्रमाने अभ्यासकांच्या समोर आलेले असले तरी आजही अनेक हस्तलिखितांचे संशोधन झालेले नाही.

लिप्यांचा अभ्यास करून या हस्तलिखितांचे संपादन करणे, संशोधन करणे ही जिकिरीची बाब आहे. परंतु मराठी वाङ्.मयाचा व महाराष्ट्राच्या संस्कृतीचा परिपूर्ण असा इतिहास लिहावयाचा असेल तर महानुभावांच्याच नव्हे, तर सर्वच धर्मसंप्रदायांचे साहित्य अभ्यासकांसमोर येण्याची आवश्यकता आहे. उपरोक्त विवेचनात नमूद केल्याप्रमाणे महानुभाव संप्रदाय आणि त्यांच्या साहित्यातील अनेक संदर्भाचे नीट आकलन न झाल्याने गैरसमजच अधिक झाले आहेत. यासाठी महानुभाव संप्रदाय आणि त्यांच्या साहित्याचे यथायोग्य संशोधन, आकलन व मूल्यमापन होण्याची आवश्यकता आहे.

## निष्कर्ष –

महानुभाव पंथाचे संस्थापक या नात्याने श्री चक्रधर स्वामीची योग्यता श्रेष्ठ आहे. श्री चक्रधर जातिभेदापलिकडचे होते, त्यांना स्त्री–पुरूषांमधली असमानता मान्य नव्हती, त्याचप्रमाणे त्यांच्यात अहिंसा हल्ली होते अशा प्रकारे त्यांचे अनेक पैलू आपण या संदर्भात पाहिले आहे.

## संदर्भ साहित्य

1) डॉ.शं.गो.तुळपुळे – स्मृतीस्थळ, अनमोल प्रकाशन, पुणे, आवृत्ती दुसरी, 1990
2) रा.शं.नगरकर – दृष्टांतपाठ, सिटी बुक स्टाफल, पुणे, आवृत्ती पहिली जुलै 1965.
3) कै.डॉ.रा.बो.मेश्राम – महानुभाव तत्वज्ञान,महानुभाव साहित्य प्रकाशन, माळवाडगाव फेब्रुवारी, 2006.
4) डॉ.शं.गो.तुळपुळे – महानुभाव पंथ आणि त्यांचे वाङ्.मय, व्हीनस प्रकाशन,पुणे, डिसेंबर 2004.
5) डॉ.अ.ना.देशपांडे – महानुभाव संताची सामाजिक आणि वाङ्.मयीन कामगिरी, सुषमा खंडार, हिंद मुद्रण, नागपूर, फेब्रुवारी 2013.